# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Ph.No : (0721) 2573027, 2572577
Website: www.jdroamt.org Email: roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/ 1858
दिनांक :- 06 JUL 2023

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदवीका/पदवी
व पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्रमांक :- १०/एडीएम/Intake Approval/२०२३/४४४ दिनाक १३जुन २०२३.
२. २अ/एडीएम/Intake Approval/२०२३/१९३ दिनाक २२ जुन २०२३.
३.या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२३/१६५२ दिनांक १४ जुन २०२३.
४. विकाअ/शिक्षण/२०२३/१७०९ दिनांक २२ जुन २०२३.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील व्यावसायिक अभ्यासक्रम चालविणा-या पदवीका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी होणा-या संस्थांनी आवश्यक कागदपत्रे सादर करुन अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेची माहीती अचूक व अद्ययावत करण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक ३ व ४ अन्वये आपणास कळविलेले आहे. त्यानुसार ब-याचश्या संस्थांनी आवश्यक कागदपत्रे सादर करुन त्यांचे संस्थेची प्रवेशाबाबतची माहीती या कार्यालयात उपस्थित राहुन या कार्यालयाचे लॉगिनमधुन अपडेट केलेली आहे.

तथापी ज्या संस्थांनी वरील अभ्यासक्रमाची माहीती अपडेट केलेली आहे अश्या संस्थांनी संस्थेच्या लॉगिनमधून तपासणी करावी व त्यामध्ये काही तफावत असल्यास उद्या **दिनांक ७/७/२०२३ रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत** या कार्यालयास सबंधित काम हाताळणा-या अधिकारी यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुन त्यामध्ये दुरुस्ती करुन घ्यावी. तसेच त्यामध्ये काही त्रृटी नसल्यास त्याबाबत सुध्दा पत्राव्दारे कळवावे. आपण तसे न कळविल्यास सदर माहीती बरोबर असल्याचे गृहीत धरुन तसे तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना या कार्यालयाव्दारे कळविण्यात येईल. माहीतीमध्ये तफावत आढळल्यास व प्रवेशाबाबत भविष्यात काही अडचणी उद्‌भवल्यास आपण स्वतः जबाबदार राहाल, याची संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.